पुढारी
जनसंपर्क कक्ष
10 MAR 2017
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**कोल्हापूर :** जागतिक महिला दिन कार्यक्रमाचे उद्घाटन करताना ऋचा पुजारी. शेजारी डॉ. जयदीप बागी आदी.

# इच्छाशक्ती, स्वयंप्रेरणा ही यशाची गुरुकिल्ली : ऋचा पुजारी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आपल्या आयुष्यातील प्रत्येक दिवशी आपल्या अंगभूत क्षमतांचा योग्य वापर करून दुर्दम्य इच्छाशक्ती, स्वयंप्रेरणा आणि इच्छाशक्तीच्या जोरावर सतत कार्यरत राहिल्यास जीवनात यशस्वी होता येते, असे प्रतिपादन जागतिक बुद्धिबळपटू ऋचा पुजारी यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रमात ऋचा पुजारी बोलत होत्या. ऋचा म्हणाल्या, 'बौद्धिक, शारीरिक व भावनात्मक यापैकी कुठल्याच पातळीवर महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत. महिलांनी सर्वच क्षेत्रांत विविध आघाड्यांवर प्रगती केली आहे. त्यामुळे प्रत्येक दिवस हा महिलादिनच आहे, असे मला वाटते.' यावेळी तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. जयदीप बागी, शरद पोवार यांनी मनोगत व्यक्त केले. तंत्रज्ञान अधिविभागातील रश्मी देशमुख, अमृता मांजरेकर, रूपाली धाबर्डे, वर्षा पाटील व पुनश्री फडणीस यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

10 MAR 2017 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात महिला दिन कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना जागतिक बुद्धिबळपटू ऋचा पुजारी. सोबत तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. जयदीप बागी.

# दुर्दम्य इच्छाशक्तीच यशाची गुरुकिल्ली

## -ऋचा पुजारी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** आयुष्यातील प्रत्येक दिवशी आपल्या अंगभूत क्षमतांचा सुयोग्य वापर करून दुर्दम्य इच्छाशक्ती, स्वयंप्रेरणा, अपूर्व मनोबलाच्या जोरावर सतत कार्यरत राहिल्यास जीवनात यशस्वी होता येते, असे प्रतिपादन महिला जागतिक बुद्धिबळपटू ऋचा पुजारी हिने केले. शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आयोजित महिला दिन कार्यक्रमात ती बोलत होती.

ऋचा पुजारी हिने अवघ्या सहाव्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात केल्यावर अभ्यास, शाळा व खेळांचे सुनियोजित व्यवस्थापन करून त्या जोरावर अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

ती म्हणाली,. बौद्धिक, शारीरिक व भावनात्मक यापैकी कुठल्याच पातळीवर महिला पुरुषांपेक्षा कमी नाहीत. महिलांनी सर्वच क्षेत्रांत विविध आघाड्यांवर सर्वदूर प्रगती केलेली आहे. त्यामुळे प्रत्येक दिवस हा महिला दिनच आहे.

डॉ. जयदीप बागी म्हणाले, महिलांनी स्वतःवरील बंधने झुगारून, काळाची गरज ओळखून प्रगत तंत्रज्ञान अवगत करून घोडदौड सुरू ठेवावी. विद्यार्थिनींना लक्ष्य ग्रुपचे प्रशिक्षक शरद पोवार यांनी आत्मसंरक्षणाचे धडे दिले. अधिविभागातील शिक्षक रश्मी देशमुख, अमृता मांजरेकर, रूपाली धाबर्डे, वर्षा पाटील व पुनश्री फडणीस यांनी संयोजन केले.

पुढारी
10 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्रीभ्रूण हत्येला कुप्रथा जबाबदार

## डॉ. सुधा कांकरिया यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

समाजातील कुप्रथा आणि अंधश्रद्धांमुळेच स्त्रीभ्रूण हत्या होत आहेत, असे स्पष्ट मत स्त्रीजन्माचे स्वागत करा, या चळवळीच्या प्रणेत्या डॉ. सुधा कांकरिया यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या 'बेटी बचाओ' अभियानांतर्गत बुधवारी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. कांकरिया म्हणाल्या, स्त्रीभ्रूण हत्येचा विषय समाजाने अत्यंत गांभियनि घेण्याची गरज आहे. भविष्यात स्त्री-पुरुष असमतोल निर्माण झाल्यास मोठ्या अराजकास समाजाला सामोरे जावे लागेल. मुलगाच हवा हा अट्टहास, मुलीला दुय्यम वागणूक, महिलांमध्ये असणारी आर्थिक, सामाजिक व शारीरिक असुरक्षितता, हुंडा पद्धती, मुलगी अविवाहित राहिल्यास कुटुंबाला कलंक अशी भावना या कारणांसह गर्भलिंग निदानाची सहज व परवडण्याजोगी उपलब्धता, वैद्यकीय क्षेत्रातील ढासळलेली नैतिकता इत्यादी कारणे स्त्रीभ्रूण हत्येला जबाबदार आहेत. यावेळी त्यांनी उपस्थितांना स्त्रीजन्माचे स्वागत करण्याची प्रतिज्ञा दिली.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'स्त्रीसबलीकरणासाठी शिक्षण, सुरक्षा व सन्मान या त्रिसूत्रीचा अवलंब करण्याची गरज आहे. त्याचबरोबर स्त्रीसन्मान हा स्त्रीच्या कुटुंबातूनच होणे आवश्यक आहे.'

डॉ. कौस्तुभ कुलकर्णी यांनी स्त्रियांमध्ये सर्वाधिक मृत्यू घडविणाऱ्या स्तनांच्या कर्करोगाविषयी माहिती दिली.

यावेळी बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक व परिचय करून दिला. डॉ. प्रतिमा एस. पवार यांनी आभार मानले.

Times of India
10 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK asks colleges to fulfil eligibility criteria of students

TIMES NEWS NETWORK

File Photo



The number of students yet to submit documents is above 10,000

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has asked all its affiliated colleges to fulfil the eligibility criteria of students yet to comply with the submission of necessary documents.

According to the university, the results of such students are generally kept pending. Giving further information, a SUK official, said, "The number of students who are yet to fulfil the eligibility criteria may go beyond 10,000. It is mere apathy on behalf of the colleges and students to not submit their eligibility documents in time. This has resulted in popping up of this issue frequently in recent times."

He added that students have to submit their required documents such as transfer certificate, migration certificate, and mark sheet of Class X and XII while taking the admission to an under-graduate course that fulfils their eligibility to the course. However, many of such students do not comply with this regulation resulting in withholding of result.

"The university's exam department on February 22 earlier last month had sent a circular to colleges reminding students of MA and other courses to submit the documents at the earliest. In fact, earlier in the month of January, the registrar had issued a circular appealing compliance of the eligibility," the official said.

The SUK has put up the names of the students who have confirmed their eligibility in the academic year 2016-17. "It is the responsibility of respective colleges to find out what documents have not been submitted by the students and let them know about it," the official added.

The official said that the students should contact their college officials for the same and need not come to the university.

Earlier this week, the SUK had sought data of clock-hour basis (CHB) teachers and eligible candidates from the respective fields and division to add into its database.

Controller of examinations (CoE), SUK, Mahesh Kakade, told TOI that according to the new Maharashtra Universities Act, 2016, universities can take assistance of the CHB teachers in exam related chores. "These teachers must have at least three years of work experience in respective subjects or field. Therefore, we have asked the colleges affiliated to SUK to submit the data by March 10," he said.

According to an SUK official, "The exam department of SUK, which is having a crunch of senior supervisors and evaluators, can breathe a sigh of relief after this decision."

Maharashtra Universities Act 1994, did not allow participation of any candidate but only the recognised professors from the affiliated colleges. But the new act is flexible enough to accommodate the CHB teachers and the experienced fellows from the respective fields.

110 MAR 2017 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाणी व्यापारीकरणाचा घाट धोकादायक

## प्राचार्य आनंद मेणसे : नैसर्गिक पाण्याचे स्रोत नष्ट होण्याच्या मार्गावर

प्रतिनिधी
कोल्हापूर

सरकारने स्वीकारलेल्या आर्थिक सुधारणावादी धोरणानंतर पाण्याच्या बाबतीत व्यापारीकरणाचा घातलेला घाट धोकादायक आहे. भांडवलदारांनी उपलब्ध नैसर्गिक जलस्रोत स्वत:च्या ताब्यात घेतले आहेत, असे सांगत नागरिकांना आरोग्याची भिती दाखवत भांडवलदार शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्याच्या नावाखाली आपला आर्थिक स्वार्थ साधत आहेत. यावर वेळीच योग्य ती उपाययोजना केली नाही तर युवा पिढीबरोबरच भविष्यकालीन पिढीला याचे अनिष्ट परिणाम भोगावे लागतील, असा इशारा बेळगाव येथील भूगर्भशास्त्रज्ञ प्राचार्य आनंद मेणसे यांनी दिला.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग आणि डॉ. जे. एफ. पाटील अमृत महोत्सव सत्कार समितीच्यावतीने 'प्रश्न पाण्याचा' या विषयावर गुरुवारी अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे होते.

यावेळी प्राचार्य आनंद मेणसे म्हणाले, सध्याच्या काळात नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. हे मार्ग नष्ट होण्यास मानवाची अविवेकी कृत्येच जबाबदार आहेत. यावर अंकुश ठेवण्यासाठी निर्माण करण्यात आलेले पर्यावरणीय नियम, कायदे याची अंमलबजावणी पारदर्शक होत नाही. वाढत जाणारे शहरीकरण व त्यातून विस्तारणारे बांधकाम क्षेत्र, कचऱ्याची विल्हेवाट, सिमेंट रस्ते, रसायनिक खते व किटकनाशके निर्मिती कारखाने, कृषी प्रक्रिया उद्योग, सांडपाणी व्यवस्था यासारख्या घटकात पर्यावरण रक्षणाची कोणतीच खबरदारी घेतली जात नसल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. आर्थिक सुधारणावादी धोरणांचा अवलंब केल्यानंतर स्वीकारण्यात आलेल्या व्यापारीकरणाच्या धोरणामुळे आणि नागरिकांच्या पर्यावरण विघातक कृत्यामुळेच आजच्या काळात नैसर्गिक वा शुद्ध पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न अधिक गंभीर होत आहे, असेही मेणसे यांनी नमुद केले.

प्रा. डॉ. पी.एस.कांबळे यांनी, नैसर्गिक साधनाचे शाश्वत विकासातील महत्व विषद केले. ते म्हणाले, कोणत्याही साधनाच्या वापराचे काही परिणाम हे हितकारक असतात तर काही विघातक असतात. सद्य परिस्थितीत पाण्याचा वापर पाहता त्याचे विघातक परिणाम जास्त होत आहेत. त्यामुळे संबंध जैवविविधतेबरोबर मानवी जीवनच धोक्यात आले आहे. प्रास्ताविक प्रा. डॉ.एम.एस.देशमुख यांनी तर पाहुण्यांची ओळख एस.टी.कोंबडे यांनी करून दिली. सूत्रसंचालन विशाल ओहळ यांनी तर आभार एस.पी.पंचगल्ले यांनी मानले.

कार्यक्रमाला अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. अर्जुनराव महाडिक, डॉ. पी. बी. कुलकर्णी, प्राचार्य राजू झाडबुके, प्रा. सुभास दगडे, प्रा. डॉ. आर.जी.दंडगे, प्रा. डॉ. व्ही.बी. ककडे, प्रा. डॉ. एम.एस.देशमुख, डॉ. व्ही. पी. कट्टी, प्रा. डॉ. मेधा पानसरे, एस. टी.कोंबडे, एस.पी.पंचगल्ले, डॉ.जे.एफ. पाटील अमृत महोत्सव सत्कार समितीचे विविध पदाधिकारी, प्राध्यापक, अर्थशास्त्राचे अभ्यासक, संशोधक विद्यार्थी आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित 'प्रश्न पाण्याचा' या विषयावर बोलताना प्राचार्य आनंद मेणसे. सोबत प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. अर्जुनराव महाडिक आदी.**

### सरकारच्या दुर्लक्षामुळे पर्यावरण धोक्यात

सरकारही विकासाच्या नावाखाली नियमबाह्य व पर्यावरणास हानीकारक ठरतील, अशा कृत्यांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. त्यामुळेच संपूर्ण पर्यावरण धोक्यात आले आहे. याशिवाय भारतीय समाजात साजरे केले जाणारे सण, उत्सव, धार्मिक विधी व कार्यक्रम, परंपरा यामुळे तर सर्व नद्या प्रदूषित झाल्या असून त्यांचे जलस्रोत समूळ नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत, असे आनंद मेणसे यांनी स्पष्ट केले.

10 MAR 2017 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आनंद मेणसे : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान

# मानवी हस्तक्षेपामुळे पाण्याचे स्रोत नष्ट

कोल्हापूर : नैसर्गिक पाण्याचे स्रोत नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. ते नष्ट होण्यास मानवाची अविवेकी कृत्येच जबाबदार आहेत. सरकारदेखील विकासाच्या नावाखाली नियमबाह्य पर्यावरणास हानीकारक ठरतील, अशा कृत्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे पर्यावरणच धोक्यात आले आहे, असे प्रतिपादन बेळगावचे भूगर्भशास्त्रज्ज्ञ व प्राचार्य आनंद मेणसे यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र अधिविभाग आणि डॉ. जे. एफ. पाटील अमृतमहोत्सव सत्कार समितीतर्फे आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, तर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील प्रमुख उपस्थित होते. अर्थशास्त्र विभागाच्या सेमिनार हॉलमधील या व्याख्यानाचा विषय 'प्रश्न पाण्याचा' असा होता. प्राचार्य मेणसे म्हणाले, आर्थिक सुधारणावादी धोरणांचा अवलंब केल्यानंतर स्वीकारण्यात आलेल्या व्यापारीकरणाच्या धोरणांमुळे आणि नागरिकांच्या पर्यावरण विघातक कृत्यामुळेच आजच्या काळात नैसर्गिक अथवा शुद्ध पाण्याच्या उपलब्धीचा प्रश्न गंभीर होत आहे. समाजात साजरे होणारे सण, उत्सव, धार्मिक विधी व कार्यक्रम, परंपरांमुळे तर सर्व नद्या प्रदूषित झाल्या आहेत. त्यांचे जलस्रोत समूळ नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. प्रा. कांबळे म्हणाले, कोणत्याही साधनाच्या वापराचे काही परिणाम हे हितकारक असतात, तर काही विघातक असतात. सध्या पाण्याचा वापर पाहता त्याचे विघातक परिणाम जास्त होत आहेत. ते टाळण्यासाठी उपाय म्हणून आवश्यक त्या मानवी गरजा पूर्ण होतील, अशा पद्धतीने नैसर्गिक साधनसामग्रीचा योग्य, वाजवी वापर व्हावा. कार्यक्रमास डॉ. अर्जुनराव महाडिक, पी. बी. कुलकर्णी, प्राचार्य राजू झाडबुके, सुभाष दगडे, आर. जी. दंडगे, व्ही. बी. ककडे, व्ही. पी. कट्टी, मेघा पानसरे, एस. टी. कोंबडे, आदी उपस्थित होते. प्रा. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. विशाल ओहाळ यांनी सूत्रसंचालन तर, एस. पी. पंचगल्ले यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

### प्राचार्य मेणसे म्हणाले

- पर्यावरण नियम, कायदे यांची अंमलबजावणी पारदर्शकपणे होत नाही.
- सरकारने स्वीकारलेल्या आर्थिक सुधारणावादी धोरणानंतर पाण्याच्या व्यापारीकरणाचा घाट.
- उपलब्ध नैसर्गिक जलस्रोत भांडवलदारांनी ताब्यात घेतले.
- भांडवलदार शुद्ध 'पाणी पुरवठ्या'च्या नावाखाली आर्थिक स्वार्थ साधत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 MAR 2017

तरुण भारत

# विद्यापीठात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**कोल्हापूर :** राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त बॅरिस्टर खर्डेकर ग्रंथालयातर्फे ब्रेल पुस्तकांचे व उपकरणांचे प्रदर्शन शिवाजी विद्यापीठात भरवण्यात आले होते. प्रदर्शनाचे उदघाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. ब्रेल पुस्तक वाचन स्पर्धेत रूपाली गोडसे, समीर शेख व रोहन लाखे यांनी अनुक्रमे क्रमांक मिळवले. परीक्षक म्हणून व्ही. आर. सुतार, डॉ. वासवानी यांनी काम पाहिले.

पुढारी
10 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चित्रपट हे विश्वसंस्कृती समजून घेण्याचे माध्यम : डॉ. राजन गवस

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** चित्रपट पाहताना माणूस दृश्य आणि त्यामागील कथन यांचा गंभीरपणे विचार करायला शिकत जातो. समाज जर अत्यंत निर्मळ व्हायचा असेल, तर आपली मने निर्मळ व्हायला हवीत. चित्रपट हे विश्वसंस्कृती समजून घेण्याचे माध्यम आहे. विद्यार्थ्यांची दृष्टी विकसित करण्यासाठी, त्यांची विवेकी मानसिक घडण होण्यासाठी ते अतिशय प्रभावी शैक्षणिक साधन आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ मराठी भाषा विभागप्रमुख प्रा. डॉ. राजन गवस यांनी केले. जागतिक महिला दिनाच्या निमित्त विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाचा दृष्टी उपक्रम आणि दक्षिणायन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चित्रपट महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात डॉ. गवस बोलत होते. डॉ. गवस म्हणाले, 'या जगात लोकशाही तत्त्व जपणारा, लिंगभेद नाकारणारा हिंसामुक्त अवकाश निर्माण करायचा असेल, तर आपण परिघाबाहेरचे, अन्यायाच्या विरोधात लढ्याची प्रेरणा देणारे परक्या भाषा व संस्कृतीचे चित्रपट पाहिले पाहिजेत.' विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, 'कोणतीही भाषा शिकत असताना त्या भाषेची संस्कृती समजून घेणे आवश्यक असते. त्यासाठी चित्रपट हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. म्हणूनच दृष्टी उपक्रमातून अनेक उत्तम दर्जाचे आशयसंपन्न चित्रपट विद्यार्थ्यांसाठी प्रदर्शित केले जातात. यावर्षी समाजात विविध स्तरांवर संघर्ष करणाऱ्या महिलांच्या लढ्याची गाथा मांडली जात आहे. त्याचा लाभ घ्यावा.' आज पहिल्या दिवशी स्मिता पाटील व नसिरुद्दीन शाह अभिनित 'मिर्च मसाला' या चित्रपटाचे प्रदर्शन झाले. त्यास विद्यार्थी व शिक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

सकाळ
जनसंपर्क कक्ष
10 MAR 2017
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जितेंद्र शिंदे एमईमध्ये प्रथम



जितेंद्र शिंदे

कोतोली, ता. ९ : गोलिवडे (ता. पन्हाळा) येथील जितेंद्र गोविंद शिंदे यांनी मास्टर ऑफ इंजिनिअरिंगमध्ये ८३ टक्के गुण मिळवून शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळविला. त्यांना विभागप्रमुख सुनील कदम, अमोल पाटील, सॅम्युअल पंडित यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे वडील गोविंद शिंदे फोटोग्राफर आहेत. जितेंद्र त्यांनी प्रतिकूल स्थितीत शिक्षण पूर्ण केले. त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पुढारी

10 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मुंबई विद्यापीठ-सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ यांच्यात आज अंतिम सामना

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

## कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

शिवाजी विद्यापीठाच्या मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर सुरू असलेल्या राज्यस्तरीय विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेचे उपांत्य सामने आज झाले. या सामन्यात मुंबई विद्यापीठ आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपापल्या प्रतिस्पर्धी संघांना पराभूत करून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामना आज १ वाजता होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू इलेव्हन संघाने उपांत्य फेरीत प्रथम फलंदाजी करताना पुणे विद्यापीठासमोर ८६ धावांचे लक्ष्य ठेवले. पुणे विद्यापीठाने फलंदाजी, गोलंदाजी व क्षेत्ररक्षण या तीन्ही आघाड्यांवर सरस कामगिरी करत हे लक्ष्य केवळ अकरा षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले. मुंबई विद्यापीठानेही राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा पराभव करीत अंतिम फेरीत प्रवेश केला.

10 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरु चषक क्रिकेट स्पर्धेत मुंबई विरुद्ध पुणे आज अंतिम लढत

**कोल्हापूर :** 'कुलगुरु टी-२० चषक' क्रिकेट स्पर्धेत पहिला उपांत्य सामना मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघाने राहुरी कृषी विद्यापीठ संघावर ८ गडी राखून, तर पुणे विद्यापीठ कर्मचारी संघाने कोल्हापूरच्या कुलगुरु इलेव्हन संघाचा ७ गडी राखून पराभव करीत स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. आज, शुक्रवारी दोन्ही विजयी संघांत अंतिम सामना होणार आहे.

शिवाजी विद्यापीठ मैदानावर पहिला उपांत्य सामना मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ व राहुरी कृषी विद्यापीठ या संघांत झाला. प्रथम फलंदाजी करताना राहुरी विद्यापीठाने २० षटकांत ८ बाद ९३ धावा केल्या.

उत्तरादाखल खेळताना मुंबई संघाने ११ षटकांत २ बाद ९७ धावा करीत हा सामना जिंकत स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. दुसरा उपांत्य सामना पुणे विद्यापीठ संघ व कोल्हापूरचा कुलगुरु इलेव्हन संघ यांच्यात झाला. प्रथम फलंदाजी करताना कुलगुरु इलेव्हन संघाने २० षटकांत ९ बाद ८६ धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना पुणे संघाने ११ षटकांत तीन बाद ८७ धावा करीत हा सामना जिंकत अंतिम फेरी गाठली. या दोन्ही विजेत्यांमध्ये अंतिम लढत आज दुपारी होणार आहे.